## Class -10 (English Medium) Maharashtra Board

# मराठी अक्षरभारती

**वेळ: ३ तास** | **एकूण गुण: १००**

**कृतिपत्रिकेसाठी सूचना: -**

(1) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.

(2) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(3) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन), आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.

(4) विभाग-5 उपयोजित लेखन प्र.5 (अ) (2) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र.1 (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.

(5) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

## विभाग १ – गद्य

**१. (अ) उतारा वाचून सूचनेनुसार कृती करा.**

**१. कोण ते लिहा.** **[२]**

i. दारिद्र्याशी संघर्ष करणारी - _______.

ii. मनाने श्रीमंत असणारे - _______.

iii. अनवाणी शाळेत जाणारे - _______.

iv. लेखकाच्या कुटुंबाला मदत करणारे - _______.

शाळा आणि शिक्षक असा विषय निघाला, की मला माझी मुंबईतील शाळा आणि शालेय जीवनातील शिक्षकांची आठवण येते. गिरगावातील युनियन हायस्कूल आणि माझ्या शाळकरी वयात आपुलकीनं संस्कार करणारे भावे सर, जोशी सर, शिर्के सर या साऱ्यांचे माझ्यावर फार मोठे ऋण आहेत.

आमचे मूळ गाव दक्षिण गोव्यातील माशेल. माझे बालपण तिथेच गेले. माझे मामाही याच गावातले. माझ्या वयाच्या सहाव्या वर्षी माझे वडील वारले आणि आम्हांला उदरनिर्वाहासाठी आमचे माशेल हे गाव सोडावे लागले. मी आणि माझी आई मुंबईत येऊन पोहोचलो. गिरगावातल्या खेतवाडीतील देशमुख गल्लीमध्ये 'मालती निवासा' तील पहिल्या माळ्यावर छोट्याशा खोल्यांमध्ये आम्ही मायलेक राहात होतो. आर्थिक परिस्थिती पूर्णपणे खालावलेली. दारिद्र्याशी संघर्ष करणारी माझी अल्पशिक्षित आई आणि शिक्षणासाठी आसुसलेला; पण कोणतीच फी भरणे शक्य नसल्याने 'शाळेत कसा जाऊ?' असे प्रश्नचिन्ह घेऊन वावरणारा मी. त्यावेळचं वातावरण हे असं होतं!

पण माझ्या आईनं धीर सोडला नाही. ती खचली नाही. वेगवेगळी कष्टाची कामं ती करत होती. त्यातच माशेलहून मुंबईत आलेले माझे मामाही मदतीला आले. त्यांच्यामुळे मला खेतवाडीतील प्राथमिक शाळेत प्रवेश मिळू शकला. ही शाळा महापालिकेची होती. माझ्याप्रमाणेच शाळेचीही परिस्थिती बेताचीच होती; पण इथले शिक्षक मात्र मनानं खूप श्रीमंत होते. पायात चप्पलही घालायला नव्हती अशा परिस्थितीत माझी शाळा सुरू होती. वयाच्या बाराव्या वर्षांपर्यंत मला अनवाणीच राहावं लागलं.

**२. योग्य जोड्या लावा.** **[२]**

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| i. | युनियन हायस्कूल | अ. | देशमुख गल्ली |
| ii. | दक्षिण गोवा | ब. | महापालिकेची प्राथमिक शाळा |
| iii. | 'मालती निवास' | क. | गिरगाव |
| iv. | खेतवाडी | ड. | माशेल |

३. **व्याकरण**

**खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांची जात ओळखून लिहा.** **[२]**

i. <u>ती</u> खचली <u>नाही.</u>

ii. <u>आर्थिक</u> परिस्थिती <u>पूर्णपणे</u> खालावलेली.

४. **स्वमत** **[२]**

'आई हीच प्रत्येक मुलाची पहिली शिक्षक असते,' हे विधान सोदाहरण स्पष्ट करा.

**(आ) उतारा वाचून सूचनेनुसार कृती करा.**

१. **वैशिष्ट्ये लिहा.** **[२]**

i. कृष्णा नदीचा प्रवाह - ________.

ii. टोपलीत ठेवलेले मूल - ________.

iii. लेखकाने सुटकेसमधून काढलेली शाल - ________.

iv. कविवर्य नारायण सुर्वे यांचे कार्यक्रम - ________.

पुढे वाईला विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून मी गेलो. तिथे नदीकाठच्या प्राज्ञ पाठशाळेच्या खोलीत मी राहत असे. खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या कृष्णा नदीच्या चिंचोळ्या प्रवाहावर होत्या. थंडीच्या दिवसात एक बाई माझ्या खिडकीखालील घाटाच्या छोट्या तटावर तिचे छोटे मूल एका टोपलीत ठेवून मासे पकडण्याच्या उद्योगात होती. तिचे बाळ कडाक्याच्या थंडीने कुडकुडत रडत होते; पण आई तिकडे बघतही नव्हती. मला मात्र राहवले नाही. मी सुटकेसमधील 'पुलकित' शाल काढली, पाचपन्नास रुपयांच्या नोटा काढल्या व त्या बाईला हाक मारली. खिडकीतून ते सर्व खाली दिले आणि म्हटले, "त्या बाळाला आधी शालीत गुंडाळ आणि मग मासे मारत बैस." या घटनेची ऊब पुलकित शालीच्या उबेपेक्षा अधिक होती.

कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा, संमेलने गाजवत. पुढे ते साहित्य संमेलनाचे अध्यक्षही झाले. परिणामतः त्यांच्या कार्यक्रमांना अहोरात्र भरतीच असे. प्रत्येक कार्यक्रमात सन्मानाची शाल व श्रीफळ त्यांना मिळत राही. एकदा ते मला म्हणाले, "या शाली घेऊन मी आता 'शालीन' बनू लागलो आहे."

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** **[२]**

i. सन्मानाची प्रतीके लिहा.

ii. पाचपन्नास रुपयांच्या नोटा लेखकाने मासे पकडणाऱ्या बाईला का दिल्या असाव्यात?

३. **व्याकरण**

i. गटात न बसणारा शब्द ओळखून लिहा. **[१]**

(अ) ठेवणे, गुंडाळणे, शहाणे, गाजणे - ________.

(ब) शाल, कृष्णा, पर्वत, नदी - ________.

ii. अनेकवचन लिहा. **[१]**

(अ) टोपली - ________.

(ब) मासा - ________.

४. **स्वमत** **[२]**

लेखक – रा.ग. जाधव यांची संवेदनशीलता जाणवणारे कोणतेही एक उदाहरण पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

## अपठित गद्य

**(इ) उतारा वाचून सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** **[२]**

बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांसाठी केलेले कार्य

____________ ____________ ____________ ____________

आनंदवनामध्ये बाबांनी कुष्ठरोग्यांना स्वाभिमानाने जगायला शिकवले. राहण्यासाठी झोपड्या बांधणे, अन्नधान्यासाठी शेती करणे यापासून अनेक पूरक उद्योग त्यांनी सुरू केले. अर्थात ही प्रक्रिया सोपी नव्हती. अनेक अडचणी होत्या; पण त्यावर मात करत बाबांनी भंगलेल्या शरीरांना, खचलेल्या मनांना जगण्याची उभारी दिली. ताठ मानाने जगण्याची प्रेरणा दिली. आनंदवनात बाबांनी कुष्ठरोग्यांवर उपचार केले, त्यांना निवास उपलब्ध करून दिला. शिवाय त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी साधने उपलब्ध करून दिली त्यामुळे त्यांना कष्टाची भाकरी मिळवता आली. त्यांच्या कलागुणांना वाव दिला त्यामुळे दैवाने मोडतोड केलेल्या चेहऱ्यांवर हास्य उमलले. हे हास्य समाधानाचे, आत्मविश्वासाचे होते.

बोटं झडलेल्या थिट्या हातांना कामाची सवय लागावी आणि स्वाभिमानाचा ताठ कणा लाभावा यासाठी 'आनंदवनाची' धडपड असते.

आनंदवन उभारताना बाबांनी अतोनात कष्ट घेतले त्यामुळेच गेली सहा दशके तिथे महारोगाने, अंधत्वाने, अपंगत्वाने झाकोळून गेलेली जीवने उजळून निघाली. जन्माला येतानाच उपेक्षा घेऊन आलेल्या जिवांमध्ये 'सुंदर मी होणार' यासोबत 'सुंदर मी करणार' हा मंत्र आनंदवनने जोपासला.

**२. योग्य जोड्या लावा.** **[२]**

| | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| i. | भंगलेली | भाकर |
| ii. | खचलेली | जीवने |
| iii. | कष्टाने मिळवलेली | मने |
| iv. | झाकोळलेली | शरीरे |

**३. व्याकरण**

i. खालील वाक्यांतील विशेषणे शोधून लिहा. **[१]**

अ. त्यांना ताठ मनाने जगण्याची प्रेरणा मिळाली.

ब. त्यांना स्वत:च्या पायावर उभे केले.

ii. खालील सर्वनामांचा वाक्यात उपयोग करा . **[१]**

अ. तू

ब. तुझा.

**४. स्वमत** **[२]**

'सुंदर मी करणार' या आनंदवनाने जोपासलेल्या मंत्राचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.

## विभाग २ – पद्य

२. **(अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१. **खालील कृती केव्हा घडतात, ते लिहा.** **[२]**

i. माता धावून जाते .............. .

ii. धरणीवर पक्षिणी झेपावते ............... .

iii. गाय हंबरत धावते ................. .

iv. हरिणी चिंतित होते ................. .

अग्निमाजि पडे बाळू।
माता धांवें कनवाळू।।१।।

तैसा धांवें माझिया काजा।
अंकिला मी दास तुझा।।२।।

सर्वेचि झेंपावें पक्षिणी।
पिलीं पडतांचि धरणीं।।३।।

भुकेलें वत्सरावें।
धेनु हुंबरत धांवे।।४।।

वणवा लागलासे वनीं।
पाडस चिंतीत हरणी।।५।।

नामा म्हणे मेघा जैसा।
विनवितो चातक तैसा।।६।।

२. कोण ते लिहा. **[२]**

i. परमेश्वर कृपेची याचना करणारे - ................ .

ii. मेघाची विनवणी करणारा - ............... .

iii. भुकेलेले - ................... .

iv. भक्ताच्या हाकेला धावून येणारा - .................. .

३. आई, प्राणी, पक्षी यांच्या मातृप्रेमाचे कवितेतून व्यक्त झालेले वर्णन तुमच्या शब्दांत लिहा. **[२]**

४. 'तैसा धांवें माझिया काजा। अंकिला मी दास तुझा।।' या ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा. **[२]**

**(आ) खालील मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा.**

**'औक्षण' किंवा 'हिरवंगार झाडासारखं'**

१. प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री – **[१]**

२. कवितेचा रचनाप्रकार – **[१]**

३. कवितेचा काव्यसंग्रह – **[१]**

४. कवितेचा विषय – **[१]**

५. कवितेतील आवडलेली ओळ – **[२]**

६. कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे – **[२]**

(इ) **खालील ओळींचे रसग्रहण करा.** [४]

दुनियेचा विचार हरघडी केला,
अगा जगमय झालो.
दु:ख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे,
याच शाळेत शिकलो.

## विभाग ३ – स्थूलवाचन

३. **खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** [६]

१. टीप लिहा: बार्क

२. तुम्हांला समजलेली 'जाता अस्ताला' या कवितेतील सूर्याची भूमिका स्पष्ट करा.

३. 'निसर्ग हा मोठा जादूगार आहे', हे विधान वाळवंटी प्रदेशाच्या संदर्भात कसे लागू पडते, ते पाठाच्या आधारे सविस्तर लिहा.

## विभाग ४ – भाषाभ्यास

४. (अ) **व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

१. **समास** [२]

**पुढील विग्रहावरून सामाजिक शब्द व समास ओळखा.**

| अ.क्र. | विग्रह | सामासिक शब्द | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| i. | नफा किंवा तोटा | | |
| ii. | प्रत्येक घरी | | |

२. **अलंकार**

**i. खालील ओळीतील अलंकार ओळखा.** [१]

आभाळागत माया तुझी आम्हांवरी राहू दे!

**ii. खालील ओळीतील अलंकार ओळखा.** [१]

उपमेय हे जणू उपमानच असते.

३. **वाक्यरूपांतर** [२]

**पुढील वाक्यांत कंसातील सूचनेनुसार बदल करा.**

i. दररोज अभ्यास करावा. ( आज्ञार्थी करा.)

ii. मला हे चित्र नापसंत नाही. ( होकारार्थी करा.)

४. **सामान्यरूप**

**तक्ता पूर्ण करा.** [२]

| मूळ शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय |
|---|---|---|
| i. मावशीने | | |
| ii. पायाला | | |

५. **वाक्प्रचार** [२]

**कंसातील वाक्प्रचारांचा खालील वाक्यांत योग्य उपयोग करा.**

( आर्जव करणे, तथ्य असणे, उत्साहाला उधाण येणे )

i. ताईचे लग्न ठरल्यावर सगळ्यांना खूप आनंद झाला.

ii. विज्ञानाच्या नियमांत सत्यता असते.

(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.

१. **शब्दसंपत्ती**

**i. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** [१]

अ. मित्र =

ब. चंद्र =

**ii. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** [१]

अ. सावध

ब. स्तुती

**iii. खालील शब्दसमूहांबद्दल एक शब्द लिहा.** [१]

अ. मत देणारा -

ब. भाषण ऐकणारा –

**iv. खालील शब्दातील अक्षरांपासून दोन अर्थपूर्ण शब्द बनवा.** [१]

वाचनालय - [ ] [ ]

२. **लेखननियमांनुसार लेखन**

**i. अचूक शब्द ओळखा.** [१]

अ. कवयत्री / कवयीत्रि / कवयीत्री / कवयित्री

ब. क्रिडांगण / क्रीडांगण / क्रिडंगण / क्रीडागण

**ii. खालील वाक्य लेखननियमांनुसार लिहा.** [१]

आपण लिहीलेला मजकुर वाचणाऱ्याला लगेच समजायला हवा.

३. **विरामचिन्हे**

**i. खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हाचा उपयोग करा.** [१]

अ. आनंदी खेळकर मुले सर्वांना आवडतात.

ब. तू केव्हा, आलीस

**ii. खालील चिन्हांची नावे लिहा.** [१]

अ. [ ! ] -

ब. [ ‘………’ ] -

४. **पारिभाषिक शब्द**

**खालील पारिभाषिक शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा.** [१]

i. Workshop - [ ………... ]

ii. Programme - [ ………... ]

५. **भाषिक खेळ**

**‘दार’ हा प्रत्यय लावून दोन शब्द लिहा.** [१]

[ ] [ ]

## विभाग ५ – उपयोजित लेखन

५. **(अ) खालील कृती सोडवा.**

१. **पत्रलेखन** [५]

आदर्श विद्यालय,
बोपर्डी, ता. वाई, जि. सातारा

**तालुकास्तरीय आंतरशालेय चित्रकला स्पर्धा**

स्पर्धा दोन गटांसाठी आयोजित
गट क्र. 1 – इ. 5 वी ते इ. 7 वी
गट क्र. 2 – इ. 8 वी ते इ. 10 वी

आकर्षक बक्षिसे

प्रवेश नि:शुल्क

स्पर्धेचे ठिकाण – आदर्श विद्यालय, मुख्य सभागृह,
बोपर्डी, ता. वाई, जि. सातारा

दि. 14 नोव्हेंबर

वेळ – सकाळी 9.00 ते 11.00

अधिकाधिक विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घ्यावा

– मुख्याध्यापक

विद्यार्थी प्रमुख या नात्याने

तालुकास्तरावर आंतरशालेय चित्रकला स्पर्धा आयोजित केल्याबद्दल मा. मुख्याध्यापक यांना त्यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

किंवा

स्पर्धेत इ. 10 वी –अ या वर्गातील वीस विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र मा. मुख्याध्यापकांना लिहा.

२. **सारांशलेखन** [५]

विभाग 1 – गद्य (इ) प्र. क्र. 1-इ मधील अपठित उताऱ्याचा 1/3 एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**(आ) खालील कृती सोडवा.**

१. **बातमीलेखन** [६]

1 ऑक्टों.

**आधारवड वृद्धनिवास**

संध्याकाळी
5 ते 7

निर्मलनगर, पुणे
जागतिक वृद्ध दिनानिमित्त विशेष
सांस्कृतिक कार्यक्रम
गायन, वादन, कथाकथन
सादरकर्ते – रसिक मित्रमंडळ, पुणे
मोफत प्रवेश
सर्वांना सस्नेह निमंत्रण

– व्यवस्थापक

वृद्ध दिनानिमित्त संपन्न झालेल्या वरील कार्यक्रमाची बातमी तयार करून लिहा.

**२. कथालेखन** **[६]**

खालील मुद्द्यांवरून गोष्ट तयार करा.


**मुद्दे –**

शाळेत जाणारा कष्टाळू – प्रामाणिक मुलगा – वाईट मित्रांची संगत – शिक्षकांना काळजी – मुलाला घेऊन बाजारात फेरफटका – उत्तम प्रतीच्या आंब्यांची खरेदी – एक खराब झालेला आंबा – दोन दिवसांनी पाहणी – नासक्या आंब्यामुळे बाकीचे आंबे खराब – संदेश –

**(इ) खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** **[८]**


**१. प्रसंगलेखन**

इ. 10 वी – निरोप समारंभ




वरील प्रसंगी तुम्ही उपस्थित होता अशी कल्पना करून त्या प्रसंगाचे लेखन करा.

**२. आत्मवृत्त**




वरील घटक तुमच्याशी बोलत आहे अशी कल्पना करा व त्या घटकाचे आत्मवृत्त लिहा.